दिन विशेष...

१५९४ : स्वराज्य संस्थापक शहाजीराजे भोसले यांचा जन्मदिन.

१८७१ : इंग्लिश गणिततज्ज्ञ ऑगस्टस द ऑर्गन यांचे निधन.

१९१९ : रौलेट ॲक्ट पास झाला.

१९६५ : अंतराळवीर अलेक्सी तिओनोव हा अंतराळात चालला.

# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

| | | |
|---|---|---|
| सेन्सेक्स | ७६,०७०.८४ | +५६७.९९ (०.७५% |
| डॉलर | ₹ ९२.४१ | |

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३७ | १९ |
| दिल्ली | ३१ | १४ |
| मुंबई | ३३ | २२ |
| नागपूर | ३४ | २१ |
| पुणे | ३५ | १६ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | बुधवार, दि. १८ मार्च २०२६ | वर्ष २ रे | अंक १२६ किंमत : ५ रु. | पाने ४


# सुटीच्या दिवशी दस्त नोंदणी सुरू राहणार; दुय्यम निबंधक कार्यालये सुरु ठेवण्याचे आदेश

वृत्तसंस्था । अलिबाग

**आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी, तसेच नूतन वर्षाच्या सुरुवातीला नवीन मालमत्ता खरेदी करण्याकडे ग्राहकांचा कल असतो. त्यामुळे दस्त नोंदणी वाढते, ही बाब लक्षात घेऊन सुट्टीच्या दिवशी दुय्यम निबंधक कार्यालये सुरु ठेवण्याचे आदेश नोंदणी महानिरीक्षकांनी सर्व जिल्ह्यातील मुद्रांक जिल्हाधिकारी यांना दिले आहेत.**

या आदेशांनुसार २६ मार्च, २८ मार्च, २९ मार्च आणि ३१ मार्च या दिवशी राज्यभरात दस्त नोंदणीसाठी दुय्यम निबंधक कार्यालये सुरु ठेवली जाणार आहेत. या शिवाय सहजिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयेही सुरू ठेवली जाणार आहेत. ज्या दुय्यम निंबधक कार्यालयांची साप्ताहीक सुट्टी ही शनीवार आणि रविवार वगळून असते. ती कार्यालये साप्ताहीक दोन सुट्ट्यांपैकी एक दिवस सुरु ठेवण्याचे निर्देश नोंदणी उपमहानिरीक्षकांनी दिले आहेत.

मुंबई शहर आणि मूंबई उपनगर यांच्यासह सर्व जिल्ह्यांसाठी हे आदेश लागू असणार आहेत.

दरवर्षी मार्च महिन्याच्या उत्तरार्धात दस्त नोंदणी प्रमाण वाढत असते, आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी जागा जमिनीत गुंतवणूक करण्याकडे जनसामान्यांचा कल असतो हीबाब लक्षात घेऊन दस्त नोंदणीत सुट्ट्यांचा अडथळा येऊ नये यासाठी मार्च महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात दुय्यम निबंधक कार्यालये सुट्टीच्या कालावधीत सुरू ठेवली जाणार आहेत.



मुद्रांक वसुली सुरु रहावी आणि इष्टांक पूर्तता व्हावी हा देखील या निर्णयामागचा उद्देश आहे. दरम्यान नोंदणी उपमहानिरीक्षकांच्या निर्देशानुसार रायगड जिल्ह्यातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालये २६, २८, २९ आणि ३१ मार्च रोजी सुरू राहणार असल्याची माहिती रायगडचे मुद्रांक जिल्हाधिकारी अमित शेडगे यांनी दिली.

## सुविचार

जीवन हे एक अविरत प्रवास आहे, ज्यात प्रत्येक वळण हे नवीन शिकवण आणि अनुभवाची संधी देते.

| सूर्योदय | - सूर्यास्त |
|---|---|
| स.-६:३६ | संध्या-६:३८ |

**सोने – चांदी**

| सोने(१० ग्रॅम) | - चांदी (प्रति किलो) |
|---|---|
| १,६०,६२०/- | २,७५,०००/- |

# विधानसभेत 'धर्मस्वातंत्र्य विधेयक' मंजूर

## प्रस्तावित कायद्याचा उद्देश फसवणूक, बळजबरी, आमिषाद्वारे होणारे धर्मांतर रोखणे हा आहे

वृत्तसंस्था । मुंबई

**महाराष्ट्र विधानसभेने धर्मस्वातंत्र्य विधेयक २०२६ आवाजी मतदानाने मंजूर केले आहे. या विधेयकात बळजबरी, फसवणूक, आमिष किंवा विवाहाच्या माध्यमातून होणाऱ्या धार्मिक धर्मांतरांना प्रतिबंध करण्यासाठी कठोर तरतुदी करण्यात आल्या आहेत.**



गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी माहिती दिली की, प्रस्तावित कायद्याचा उद्देश घटनात्मक अधिकारांचे रक्षण करत असतानाच फसवणूक, बळजबरी किंवा आमिषाद्वारे होणारे धर्मांतर रोखणे हा आहे. धार्मिक धर्मांतर हे स्वेच्छेने आणि पारदर्शक पद्धतीनेच व्हावे, हे या विधेयकाचे उद्दिष्ट आहे.

काही सदस्यांनी विधेयकातील एका तरतुदीवर आक्षेप घेतला होता. या तरतुदीनुसार दुसऱ्या धर्मात धर्मांतर करू इच्छिणाऱ्या व्यक्तीला जिल्हा दंडाधिकाऱ्यांना ६० दिवस आधी पूर्वसूचना देणे बंधनकारक आहे. सदस्यांनी या तरतुदीला अन्यायकारक आणि घटनात्मक हमींच्या विरोधात असल्याचे म्हटले. या तरतुदीचा उद्देश केवळ हे पडताळून पाहणे हा आहे की, धर्मांतर हे व्यक्तीच्या मुक्त इच्छेने होत आहे. ही प्रक्रिया वैयक्तिक स्वातंत्र्यावर निर्बंध घालण्यासाठी नसून, पारदर्शकता आणि संरक्षण प्रदान करण्यासाठी आहे. धर्मांतरानंतर २१ दिवसांच्या आत अधिकाऱ्यांना माहिती देण्याच्या आवश्यकतेबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नाचेही निरसन केले. या नियमाचे पालन न झाल्यास धर्मांतर अवैध मानले जाण्याची शक्यता असते. ही अट केवळ प्रशासकीय नोंदी ठेवण्यासाठी आणि भविष्यात उद्भवू शकणारे संभाव्य कायदेशीर व सामाजिक वाद टाळण्यासाठी ठेवण्यात आली असल्याचे ते म्हणाले.

बळजबरीने केलेल्या धर्मांतराबाबत नातेवाईक किंवा इतर व्यक्ती तक्रार दाखल करू शकतात. अनेक प्रकरणांमध्ये पीडित व्यक्ती स्वतः पोलिसांकडे जाण्याच्या स्थितीत नसतात, असे त्यांनी सांगितले.

भोयर पुढे म्हणाले, हा कायदा प्रौढ व्यक्तींना आपला धर्म बदलण्याच्या अधिकारापासून वंचित करत नाही. तसेच संविधानाने धर्म स्वीकारण्याचे, त्याचे आचरण करण्याचे आणि त्याचा प्रचार करण्याचे स्वातंत्र्य प्रदान केले आहे.

**➤ तथापि, फसवणूक, बळजबरी किंवा प्रलोभनांद्वारे केल्या जाणाऱ्या धर्मांतरांना आळा घालण्यासाठी कायदे करण्याचा अधिकार राज्याला असल्याचेही त्यांनी नमूद केले. चर्चेनंतर सभागृहाने महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक, २०२६ हे विधेयक आवाजी मतदानाने मंजूर केले. पीठासीन अधिकारी संजय केळकर यांनी हे विधेयक मंजूर झाल्याचे घोषित केले.**

### ➤ सर्वांना समान कायदा लागू

**या कायद्याचा उद्देश कोणत्याही विशिष्ट धर्माला किंवा समुदायाला लक्ष्य करणे हा नसून, तो सर्वांना समान रीतीने लागू होईल. या कायद्याच्या अंमलबजावणीदरम्यान महिलांच्या अधिकारांचे संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी विशेष काळजी घेतली जाईल. तसेच, महिला, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि अल्पवयीन व्यक्तींना सक्तीच्या किंवा फसवणुकीने केल्या जाणाऱ्या धर्मांतरांपासून सुरक्षित ठेवणे हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे. जर एखाद्या बेकायदेशीर धर्मांतराच्या आधारे विवाह झाला आणि त्यातून अपत्याचा जन्म झाला, तर या विधेयकानुसार त्या अपत्याचा धर्म हा धर्मांतरापूर्वी आईचा जो मूळ धर्म होता, तोच मानला जाईल.**

# ६ महिने गॅस सिलिंडर न वापरण्याचा धुळे जिल्ह्यातील तीन गावांचा ग्रामसभेत ठराव



प्रतिनिधी । धुळे

**आखाती देशांमध्ये निर्माण झालेल्या युद्धजन्य तणावाचे पडसाद आता जागतिक स्तरावर उमटू लागले असून कच्च्या तेलाच्या पुरवठ्यावर त्याचा गंभीर परिणाम होत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात इंधन दर सातत्याने वाढत असल्याने भविष्यात इंधन टंचाई निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या पार्श्वभूमीवर इंधन बचतीसाठी महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्यातील तीन गावांनी घेतलेला निर्णय सध्या राज्यभर चर्चेचा विषय ठरत आहे.**

बारीपाडा, मोहगाव आणि चावडीपाडा या तीन गावांनी एकत्र येत पुढील सहा महिन्यांसाठी एलपीजी गॅसचा वापर पूर्णपणे बंद करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागातून इंधन बचतीचा एक वेगळा आणि सकारात्मक संदेश दिला जात आहे. या संदर्भात आयोजित विशेष बैठकीत तिन्ही गावांतील ग्रामस्थ, सरपंच, उपसरपंच आणि विविध संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वानुमते ठराव मंजूर करताना देशहित सर्वोच्च ही भूमिका स्पष्टपणे मांडण्यात आली. शहरांमध्ये राहणाऱ्या नागरिकांकडे पर्यायी इंधनस्रोत उपलब्ध नसल्यामुळे त्यांना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी ग्रामीण भागातील या गावांनी स्वतःहून त्याग करण्याचा निर्णय घेतल्याचे बैठकीत सांगण्यात आले. गावकऱ्यांकडे पारंपरिक चुली, लाकूडकाटा, गोवऱ्या यांसारखे पर्याय उपलब्ध असल्याने त्यांनी या साधनांचा वापर वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचबरोबर धूरमुक्त चुली, सेंद्रिय इंधन आणि पर्यावरणपूरक उपायांचा अवलंब करण्यावरही भर (पान २ वर)

## थोडक्यात

### भाजप आमदार मंदा म्हात्रे यांना हृदयविकाराचा झटका



**बेलापूर ।** येथील मतदारसंघाच्या भाजप आमदार मंदा म्हात्रे यांना मंगळवारी पहाटे हृदयविकाराचा झटका आला. रात्री साधारण २.३० वाजेच्या सुमारास त्यांची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांना तातडीने नवी मुंबईतील अपोलो हॉस्पिटलात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी तपासणी करून रात्रीच त्यांच्यावर यशस्वी शस्त्रक्रिया केली. शस्त्रक्रियेदरम्यान त्यांच्या हृदयात दोन स्टेंट बसविण्यात आल्याची माहिती त्यांचे सुपुत्र निलेश म्हात्रे यांनी दिली. मंदा म्हात्रे यांची प्रकृती स्थिर आहे.

### महाविद्यालयांची अतिरिक्त लूट सुरूच

**मुंबई ।** राज्यातील मुलींना व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण १००टक्के मोफत देण्याच्या निर्णयाचा सरकारकडून मोठा गाजावाजा केला. मात्र, सरकारी तिजोरीतून शुल्क भरले जात असतानाच, दुसरीकडे इतर शुल्क आणि अतिरिक्त शुल्काच्या नावाखाली खासगी महाविद्यालयांनी विद्यार्थिनींची लूटीचा सपाटा लावला. उच्च व तंत्र शिक्षणमंत्र्यांनी विधानसभेत जादा शुल्क घेणाऱ्या महाविद्यालयांची मान्यता रद्द करू, अशी घोषणा केली आहे.

# पाळधी ते तरसोद बाह्यवळण महामार्गावरील रेल्वे उड्डाणपूल ठरू शकतो धोकादायक!

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील वाहतूक कोंडी आणि अपघातांचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आलेला पाळधी ते तरसोद बाह्यवळण महामार्ग सध्या वाहनधारकांसाठी सोयीचा ठरत आहे. मात्र, या महामार्गावरील काही अपूर्ण व त्रुटीपूर्ण कामांमुळे अपघाताचा धोका निर्माण होत असल्याचे चित्र दिसत आहे. विशेषतः पाळधी परिसरातील पश्चिम रेल्वेच्या मार्गावर असलेल्या उड्डाणपुलावरुन जाताना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत असल्याने वाहनधारकांमधून चिंता व्यक्त होत आहे.**



पाळधी ते तरसोद बाह्यवळण महामार्ग कार्यान्वित झाल्यापासून जळगाव शहरातील अवजड वाहनांची वाहतूक मोठ्या प्रमाणावर कमी झाली आहे. यामुळे शहरातील वाहतूक कोंडी कमी होऊन नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. पूर्वी शहरातील मुख्य रस्त्यांवरून जाणाऱ्या ट्रक, ट्रेलर आणि इतर मोठ्या वाहनांमुळे वारंवार अपघात घडत होते. बाह्यवळण महामार्ग सुरू (पान २ वर)

# पाकिस्तानचा अफगाणिस्तानवर एअरस्ट्राईक

## ४०० जण ठार; अफगाणिस्तानमध्ये संतापाची लाट

वृत्तसंस्था । काबुल

पाकिस्तानने सोमवारी रात्री पुन्हा एकदा अफगाणिस्तानवर हवाई हल्ला केला आहे. पाकिस्तानी हवाई दलाच्या लढाऊ विमानांनी राजधानी काबुलमधील अनेक भागांना लक्ष्य केले, ज्यात एक रुग्णालय देखील होते. रॉयटर्स वृत्तसंस्थेनुसार, यात ४०० लोकांचा मृत्यू झाला असून, २५० हून अधिक जखमी झाले आहेत.



वृत्तानुसार, दारुलअमान, अरजान किंमत, खैरखाना आणि काबुल आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या आसपास अनेक ठिकाणी स्फोट आणि गोळीबाराचे आवाज ऐकू आले.

तालिबान सरकारचे प्रवक्ते जबीहुल्लाह मुजाहिद यांनी आरोप केला आहे की, पाकिस्तानी सैन्याने काबुलमधील एका व्यसनमुक्ती रुग्णालयावर बॉम्ब टाकले.तालिबानने या हल्ल्याचा तीव्र निषेध करत याला मानवतेविरुद्धचा गुन्हा म्हटले आहे आणि पाकिस्तानने अफगाणिस्तानच्या (पान २ वर)

# खान्देशच्या शेतकऱ्यांनो, काढणीला आलेली पिके वाचवा

## राज्यात आजपासून तीन दिवस वादळी पावसासह गारपिटीची शक्यता

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यात १७ ते २० मार्च दरम्यान पुढील तीन दिवस विदर्भ, मराठवाडा, खानदेश आणि मध्य महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये ढगाळ वातावरण निर्माण होऊन मेघगर्जनेसह वादळी पाऊस आणि काही ठिकाणी गारपीट होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. या हवामान खात्याच्या अंदाजाने शेतकऱ्याच्या तोंडचे पाणी पळाले आहे. त्यामुळे काढणीस आलेली पिके वाचवण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड सुरू झाली आहे.**



राज्यात १७ मार्च रोजी वादळी पावसाची सर्वाधिक शक्यता राज्यातील दक्षिण भागांमध्ये राहील. यात विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील दक्षिणेकडील जिल्ह्यांचा समावेश असून प्रामुख्याने तेलंगणा आणि कर्नाटक सीमेजवळील भाग प्रभावित होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. १७ ते २० मार्च दरम्यान वादळी पावसाची तीव्रता आणि क्षेत्र वाढण्याची शक्यता आहे. या काळात विदर्भ, मराठवाडा, खान्देश व मध्य महाराष्ट्रात ढगाळ वातावरणासह वादळी पावसाची शक्यता आहे. काही जिल्ह्यांमध्ये गारपीट देखील होऊ शकते. २१ मार्चपासून राज्यातील हवामान स्थिर होण्याचे संकेत आहेत. रब्बी पिकांची काढणी सुरू असल्याने शेतकऱ्यांनी पाऊस, गारपीट आणि वादळी वाऱ्यांपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी. काढणी आलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवावी तसेच बाजार समित्यांमध्ये आणलेले धान्य व इतर कृषीमाल पावसापासून सुरक्षित राहील यासाठी त्यावर ताडपत्री किंवा अन्य संरक्षणात्मक आच्छादन करावे, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे. मेघगर्जना आणि विजेच्या कडकडाटाच्या वेळी नागरिकांनी व शेतकऱ्यांनी स्वतःची व पाळीव जनावरांची सुरक्षितस्थळी हलवावे करावी. अशा वेळी झाडाखाली, शेडखाली, तसेच विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ उभे राहणे टाळावे, असेही आवाहन केले आहे.

# इराणमधील युद्ध तात्काळ थांबवा; चीनने अमेरिकेला खडसावले

वृत्तसंस्था । बीजिंग

**पश्चिम आशियामध्ये सुरू असलेले युद्ध थांबवण्यात यावे. यासाठी सर्व संबंधितांनी पुढाकार घ्यावा, असे चीनने म्हटले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मूझची सामुद्रधुनी आंतरराष्ट्रीय वाहतुकीसाठी खुली करण्यासाठी चीन सोडून इतर देशांना या युद्धामध्ये सामील होण्याचे आवाहन केले होते.त्या आवाहनाला उत्तर देताना चीनने अमेरिकेला चक्क खडसावले आहे.**



इतर देशांनी ट्रम्प यांना सककारात्मक प्रतिसाद दिलेला नसताना चीनने मात्र ट्रम्प यांच्याविरोधात भूमिका घेतली आहे. ट्रम्प या महिन्याच्या उत्तरार्धामध्ये चीनला जाणार आहेत. मात्र ट्रम्प यांच्या या भूमिकेमुळे त्यांच्या या नियोजित दौऱ्याबाबत फेरविचार केला जात असल्याचेही चीनने म्हटले आहे. परिणामी ट्रम्प यांना चीनचा दौरा एकतर लांबणीवर टाकावा लागू शकतो अथवा पुर्णपणे रद्द करावा लागू शकतो. (पान २ वर)

## संपादकीय

### संकटातून मार्ग काढावा लागणार

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळात एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. भारत-चीन तणावामुळे गेल्या काही वर्षांपासून चीनमधून होणाऱ्या गुंतवणुकीवर निर्बंध आहेत. आता हे निर्बंध हटवले जाणार आहेत. केंद्र सरकारने गेल्या आठवड्यात परदेशी थेट भांडवल गुंतवणुकीसंबंधी काही धोरणात्मक बदल केले आहेत. मोबाइल फोनचे घटक आणि रेअर अर्थ मॅग्नेट्स म्हणजेच दुर्मिळ खनिजक्षेत्रात गुंतवणूक वाढावी, हा त्यामागील हेतू आहे. हे धोरण भारताच्या सीमेला लागून असलेल्या देशांच्या संदर्भातील आहे. एप्रिल २०२० पासून सीमावर्ती देशांमधून येणाऱ्या (लँड बॉर्डरिंग कंट्रीज एलबीसी) गुंतवणुकीसंबंधात पूर्वी काही निर्बंध जाहीर करण्यात आले होते. त्यावेळी करोना होता आणि गलवान खोऱ्यात चीनने घुसखोरी केली होती. भारत व चीन यांचे संबंध अत्यंत तणावपूर्ण बनलेले होते. कोविड महामारीच्या काळात अनेक स्थानिक भारतीय कंपन्यांचे मूल्यांकन कमी झाले होते. त्यामुळे चिनी कंपन्यांनी, भारतीय कंपन्या ताब्यात घेऊन आपला फायदा करून घेतला असता. हे लक्षात घेऊन ही नियंत्रणे लादण्यात आली होती. आता भांडवली सामग्री, इलेक्ट्रॉनिक भांडवली वस्तू, इलेक्ट्रॉनिक घटक, पॉलिसीलिकॉन इनगॉट वेफर आणि रेअर मॅग्नेट या क्षेत्रांत एलबीसींकडून गुंतवणूक आल्यास ६० दिवसांत त्याबाबत निर्णय घेतला जाणार आहे. जर दहा टक्क्यांपर्यंत भागभांडवल गुंतवणूक केली जाणार असेल, तर त्यास ऑटोमॅटिक मंजुरी दिली जाईल, मुख्यतः प्रायव्हेट इक्विटी आणि व्हेंचर कॅपिटल फंडांना या सवलतीचा अधिक फायदा मिळणार आहे. भारतात जास्तीत जास्त भांडवल तसेच तंत्रज्ञान यावे आणि त्याचवेळी कंपन्यांच्या मालकीवर भारतीयांचेच वर्चस्व राहावे हा त्यामागील हेतू आहे.

संरक्षण सामग्री, वाहने अशा उद्योगांत इलेक्ट्रॉनिक घटक आणि दुर्मिळ खनिजे हे महत्त्वाचे भाग असतात. उच्च किमतीचे जे जे उद्योग असतात, त्यामध्ये ही सामग्री महत्त्वाची ठरते. दुर्मिळ खनिजांच्या प्रक्रिया क्षेत्रात जगात चीनचे वर्चस्व आहे आणि अमेरिकेबरोबरच्या टॅरिफ युद्धात चीनने याच गोष्टीचा फायदा घेतला. म्हणूनच या क्षेत्रात स्वयंपूर्णतः प्राप्त करणे भारताच्या दृष्टीनेदेखील फायदेशीर आहे. जागतिक व्यापार क्षेत्रात अमेरिकेच्या वा कोणाच्याही दादागिरीचा मुकाबला करायचा असेल, तर या बाबतीत चीनचे अनुकरण करणे हे योग्य आहे. हे नवे धोरण भारत सरकार प्रभावीपणे अमलात आणेल, अशी अपेक्षा आहे. सध्या आखातातील भूराजकीय तणाव वाढू लागला असून, केंद्र सरकारने आधीच घरगुती गॅसचा, अर्थात एलपीजीचा तुटवडा पाहता, युद्धपातळीवर उपाय सुरू केले आहेत. मालवाहतुकीचा खर्च वाढल्यामुळे सर्वच वस्तूंच्या किमतींत वाढ झाली आहे. ९० डॉलर प्रतिबॅरलवर कच्च्या तेलाचे दर राहिले, तर किरकोळ महागाईदर ०.८ टक्क्याने वाढण्याची भीती आहे. अर्थात, केवळ भारतातच नाही, तर सर्वच देशांत अशाप्रकारची स्थिती आहे. या सर्व प्रतिकूल वातावरणाचा विदेशी गुंतवणुकीसही फटका बसू शकतो. मात्र, भारताला आपल्या उत्पादनक्षेत्राचा विस्तार करायचा असल्यामुळे आणि पुरवठासाखळीत खंड पडू नये ही इच्छा असल्याने, संकटातूनही मार्ग काढावा लागणार आहे. म्हणूनच केंद्र सरकारने विदेशी गुंतवणुकीसंदर्भात (एफडीआय) नियम शिथिल करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे विशेषतः चीनमधून होणाऱ्या गुंतवणुकीवर गेल्या काही वर्षांपासून लागू असलेले निर्बंध हटवले जाणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून, तो स्वागतार्हच आहे.

# ऑन ग्रीड रुफ टॉप सोलर सिस्टीममुळे वीजबिलात होतेय लक्षणीय बचत

## माझी वसुंधरा योजनेचे उदिष्ट सफल; धुळे मनपा आयुक्त नितीन कापडणीस यांची माहिती

प्रतिनिधी । धुळे

**माझी वसुंधरा योजने अंतर्गत धुळे महापालिकेच्या नूतन इमारतीवर बसविण्यात आलेल्या ऑन ग्रीड रुफ टॉप सोलर सिस्टीममुळे विजबिलात लक्षणीय बचत होत आहे. त्यानिमित्ताने माझी वसुंधरा योजनेचे उदिष्ट सफल झाल्याचे आयुक्त नितीन कापडणीस यांनी सांगितले.**



माझी वसुंधरा योजनेच्या यशस्वी कार्यवाहीमुळे धुळे महानगरपालिकेस ४ कोटीचे बक्षीस प्राप्त झालेले होते. या प्राप्त निधीतून विविध कामे घेण्यात आलेली होती. यात धुळे महानगरपालिकेच्या नूतन इमारतीवर ऑन ग्रीड रुफ टॉप सोलर सिस्टीम बसविण्याचा निर्णय घेण्यात आलेला होता. २०० के.डब्ल्यू.पी क्षमतेचे व तसेच १.२० कोटी मात्र खर्चातून सदर सोलर सिस्टीम धुळे महानगरपालिकेच्या बसविण्यात आली. सदर सोलर सिस्टीम सप्टेंबर २०२५ पासून कार्यान्वित झालेली आहे. सदर सोलर सिस्टीम कार्यान्वित झाल्यानंतर सप्टेंबर-ऑक्टोबर व नोव्हेंबर या तीन महिन्यातील एकूण सोलर युनिट व विद्युत बिलाची रक्कम तपासणी केली असता यात लक्षणीय बदल व बचत झाल्याचे निर्दशनास आले आहे. यात दरमहा सुमारे १ ते १.५० लक्ष रुपयांची बचत झालेली आहे. सदर यशस्वी कार्यवाहीमुळे शहरातील मनपा मालकीच्या जागेवर सोलर सिस्टीम कार्यान्वित होणार आहे. यात अमृत २.० योजने अंतर्गत सुखवद व बाभळे जलशुध्दीकरण केंद्र येथे प्रत्येकी १ मेगावॅट, अक्कलपाडा जलशुध्दीकरण केंद्र येथे १०० किलोवॅट तसेच गांडुळ खत प्रकल्प येथे ३०० किलोवॅट क्षमतेची सोलर सिस्टीम बसविण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर सोलर सिस्टीम कार्यान्वित झाल्यानंतर सुमारे दरमहा २५ लक्ष मात्र रुपयांची बचत अपेक्षित आहे. विद्युत बिलाचा होणारा मोठ्या प्रमाणावर खर्चामुळे मनपाच्या अर्थिक स्थितीवर प्रचंड ताण निर्माण होत होता. त्यामुळे सदर विद्युत बिलात होणारी बचत ही निश्चीतच महत्वाची असून माझी वसुंधरा योजना यशस्वी होण्यासाठी घेण्यात आलेला हा निर्णय धुळे महानगरपालिकेच्या दृष्टीने महत्वपूर्ण असल्याचे आयुक्त नितीन कापडणीस यांनी सांगितले.

### ➢ विद्युत बिलात होणारी बचत निश्चीतच महत्वाची

धुळे महापालिकेचा विद्युत बिलामुळे मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या खर्चामुळे मनपाच्या अर्थिक स्थितीवर प्रचंड ताण निर्माण होत होता. ऑन ग्रीड रुफ टॉप सोलर सिस्टीममुळे आता सदर विद्युत बिलात होणारी बचत ही निश्चीतच महत्वाची आहे.

### कोरोना योद्धा संघर्ष समितीचे पालकमंत्र्यांना निवेदन

प्रतिनिधी । जळगाव

कोरोनाच्या पहिल्या व दुसऱ्या लाटेत ठेका पद्धतीने काम करणाऱ्या अनुभवी कंत्राटी कामगारांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुणालय जळगाव येथील स्मार्ट कंपनीच्या ठेक्यामध्ये कामावर रुजू करण्याबाबत पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांना कंत्राटी कोरोना योद्धा संघर्ष समितीतर्फे नुकतेच पाळधी येथील निवासस्थानी निवेदन देण्यात आले. कोरोनाच्या पहिल्या-दुसऱ्या लाटेत सेवा बजाविलेल्या काही अनुभवी कोविड कंत्राटी कामगार यांना स्मार्ट कंपनीने पुन्हा सेवेत घेतले पाहिजे होते. परंतु, जुन्या काही अनुभवी कंत्राटी कामगारांना डावलण्यात आलेले आहे. उर्वरीत राहिलेल्या कोविड कंत्राटी कामगारांना कामाची अत्यंत गरज असल्याने त्यांना स्मार्ट कंपनीच्या ठेक्यामध्ये कंत्राटी स्वरूपात कंत्राटी कामगारांना त्यांच्या शैक्षणिक अहर्तेनुसार ठेक्यामध्ये रुजू करून घेण्यात यावे,अशी मागणी निलेश बोरा, बबन सावळे, भूषण पाटील, विलास तायडे, कुणाल विसपूते, कृष्णा सावळे, विनोद सपकाळे,रविंद्र कोळी, सागर चौधरी, रमेश वानखेडे, जयेश वसाने, सागर बाविस्कर यांनी केली आहे.

### मुक्ताईनगरला सात शिक्षक केंद्रप्रमुख पदाच्या परीक्षेत गुणवत्ता यादीत! पती-पत्नी दोघांचे यश

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

**राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या निर्देशानुसार राज्य शिक्षण परिषदेने आय बीपीमार्फत घेतलेल्या केंद्रप्रमुख पदाच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. त्यात मुक्ताईनगर तालुक्यातील सात शिक्षक गुणवत्तेनुसार उत्तीर्ण झालेले आहेत.**

गेल्या ३ ते ६ जानेवारी २०२६ दरम्यान राज्य शिक्षण परिषदेने आयबीपी एजन्सीमार्फत केंद्रप्रमुख पदाची ऑनलाइन परीक्षा घेतली होती. राज्यभरातून त्यास सुमारे ८५ हजार परीक्षार्थी बसलेले होते. नुकत्याच निकाल जाहीर झालेला आहे. सध्या जाहीर झालेल्या केंद्रप्रमुख परीक्षेच्या निकालामध्ये राहुल भंगाळे गुण १६५, सध्या कार्यरत चांगदेव जि.प.मुलांची शाळा, संदीप सोनवणे गुण १६१, सध्या कार्यरत जि.प.शाळा रिगाव, प्रवीण पाटील गुण १५६, जि.प.शाळा नायगाव, संतोष धनगर, गुण १५३, जि.प शाळा तरोडा, कुलश्री गवळी, गुण १५३ जि.प.शाळा उचंदा, मनीष बोरोकार, गुण १५०, जि.प.शाळा भोटा, दिनेश शिर्के, गुण १४७, जि.प.शाळा उचंदा. उचंदा मराठी शाळेत कार्यरत कुलश्री गवळी व दिनेश शिर्के हे दोघे शिक्षक पती-पत्नी आहेत.

## शहरी शबरी आवास घरकुल योजनेंतर्गत २० रोजी शिबीर

प्रतिनिधी । धुळे



धुळे महानगरपालिकेमार्फत अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणाऱ्या शहरी शबरी आवास घरकुल योजने अंतर्गत बांधकाम परवानगी व इतर कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी व लाभार्थ्यांना त्वरीत लाभ देण्यासाठी आयुक्त नितीन कापडणीस यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष शिबिराचे आयोजन दि. २० मार्च रोजी सकाळी १० ते ३ या वेळात धुळे महानगरपालिकेच्या जुन्या इमारतीच्या प्रांगणात करण्यात आलेले आहे.

धुळे महानगरपालिकेमार्फत अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणाऱ्या शहरी शबरी आवास घरकुल योजना राबविण्यात येत आहे. यासाठी पात्र लाभार्थ्यांना चार टप्यात रुपये २.५० लक्ष मात्र अनुदान घरकुल बांधण्यासाठी शासनामार्फत देण्यात येते. आदिवासी विकास प्रकल्पाअंतर्गत यातील एकूण ९० लाभार्थ्यांना मान्यता देण्यात आलेली आहे. यातील ५७ लाभार्थी निश्चीत झालेले आहे. तथापी सदर लाभार्थ्यांकडे ८-अ चा उतारा असल्याने व लाभार्थ्यांकडे असलेली जागा गावठाण भागात येत असल्याने बांधकाम परवानगी देण्यास अडचणी निर्माण होत होत्या. तथापी शासनामार्फत नविन निर्णय पारीत झालेला असून सदर निर्णयानुसार ३ वर्षाच्या मालमत्ता कर पावतीच्या आधारे लाभार्थ्यांना पात्र ठरविता येणार आहे. त्यासाठी सदर लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ तातडीने मिळावा व लाभार्थ्यांकडून आवश्यक ते कागदपत्रे जमा करुन तात्काळ बांधकाम परवानगी देण्यासाठी सदर शिबीराचे आयोजन आयुक्त नितीन कापडणीस यांच्या संकल्पनेतून करण्यात आले आहे.

यासाठी पात्र लाभार्थ्यांनी नविन महापालिकेतील बांधकाम विभागातून लागणाऱ्या कागदपत्रांची माहिती घेऊन नोंदणीकृत अभियंत्यांमार्फत बांधकाम परवानगी प्रस्ताव दि.२० मार्च रोजी सादर करावेत, शिबिरात उपस्थित अधिकाऱ्यांमार्फत तातडीने पडताळणी करुन बांधकाम परवानगी देण्यात येणार आहे.

## पान १ वरुन

### ६ महिने गॅस सिलिंडर......

देण्यात आला आहे. या बैठकीला बारीपाडाचे सरपंच अनिल पवार, मोहगावचे सरपंच लक्ष्मण महाले, चावडीपाडाचे सरपंच रमण बहिरम, मोहगावचे उपसरपंच सुरेश चौरे तसेच चावडीपाडाच्या उपसरपंच हीनाबाई सोनवणे यांची उपस्थिती होती. तालुका समन्वय समितीचे सदस्य उमेश देशमुख यांनी मार्गदर्शन केले. याशिवाय पद्मश्री चैत्राम पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा निर्णय अधिक बळकट झाला. ग्रामस्थांमध्ये साहेबराव पवार, विमलताई पवार, शेवंताबाई पवार, संगीताताई पवार, सोमनाथ गांगुर्डे, रमेश गावित, बाबुराव अहिरे, सापटू अहिरे, देविदास पवार, कैलास पवार यांसह अनेकांनी सक्रिय सहभाग घेतला. वनवासी विकास प्रतिष्ठानचे पराग पंचभाई आणि पृथ्वी मोलाची फाऊंडेशनच्या केतकी कुऱ्हेकर यांची उपस्थितीही उल्लेखनीय ठरली. या निर्णयाची अंमलबजावणी करताना महिलांना कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी विशेष नियोजन करण्यात येणार असल्याचेही बैठकीत स्पष्ट करण्यात आले.तसेच आवश्यक त्या ठिकाणी सामूहिक स्वयंपाक केंद्रे उभारण्याचा प्रस्तावही चर्चेत आला. या निर्णयाचे गावकऱ्यांनी उत्स्फूर्त स्वागत केले असून 'देशासाठी थोडा त्याग करण्याची हीच वेळ आहे,' अशी भावना व्यक्त केली. काहींनी हा उपक्रम सहा महिन्यांनंतरही सुरू ठेवण्याची तयारी दर्शवली.

### पाकिस्तानचा अफगाणिस्तानवर......

हवाई हद्दीचे उल्लंघन केल्याचे म्हटले आहे. तर, पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांचे प्रवक्ते मोशर्रफ जैदी यांनी हे आरोप निराधार असल्याचे म्हटले आणि काबुलमधील कोणत्याही रुग्णालयाला लक्ष्य केले नसल्याचे सांगितले.वाढता सीमा तणाव आणि रक्तरंजित संघर्ष - हवाई हल्ल्याच्या काही तास आधी, सीमेवर दोन्ही देशांच्या सैन्यांमध्ये जोरदार गोळीबार सुरू झाला. स्थानिक अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, पाकिस्तानमधून डागलेले मोर्टारचे गोळे खोस्त प्रांतातील गावांवर आदळले, ज्यात दोन मुलांसह चार जण ठार झाले. पाकिस्तानचा दावा आहे की, अफगाणिस्तानमधून डागलेल्या एका गोळ्यामुळे बाजोर जिल्ह्यात एकाच कुटुंबातील चार सदस्य ठार झाले. दोन्ही देशांमधील सुरू असलेला संघर्ष गेल्या अनेक वर्षांतील सर्वात प्राणघातक टप्प्यावर पोहोचला आहे.

### पाळधी ते तरसोद बाह्यवळण......

झाल्यानंतर या समस्येत काही प्रमाणात सुधारणा झाली आहे. मात्र, दुसरीकडे बाह्यवळण महामार्गावर वाहनांचा वेग वाढल्यामुळे काही ठिकाणी अपघातांचे प्रमाण वाढताना दिसत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी वेगाने धावणारी वाहने, अपुरी सुरक्षा व्यवस्था आणि काही ठिकाणी राहून गेलेले बांधकामातील दोष यामुळे धोका अधिक वाढत आहे. त्यामुळे बाह्यवळण मार्गावरील सर्व उड्डाणपूल, वळणे आणि संवेदनशील ठिकाणांची तांत्रिक तपासणी करून आवश्यक त्या सुधारणा करण्याची मागणी स्थानिक नागरिक आणि वाहनधारकांकडून होत आहे. पाळधीचा उड्डाणपूल कसा धोकादायक? - पाळधी नजीकच्या जळगाव ते उधना रेल्वेमार्गावरील उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजूंना बसविण्यात आलेले संरक्षणात्मक कठडे जेमतेम अडीच फूट उंचीचे असल्याचे निदर्शनास आले आहे. महामार्गावरून वेगाने धावणारी लहान-मोठी वाहने लक्षात घेतल्यास ही उंची अत्यंत अपुरी असल्याचे वाहनधारकांचे मत आहे. एखादे वाहन वेगात असताना चालकाचा ताबा सुटल्यास किंवा वाहन घसरल्यास ते थेट कठड्यांना धडकू शकते. अशा वेळी कठडे कमी उंचीचे असल्यामुळे वाहन उड्डाणपुलावरून थेट खाली कोसळण्याचा गंभीर धोका निर्माण होऊ शकतो.

### इराणमधील युद्ध तात्काळ......

होर्मुझच्या सामुद्रधुनी आणि लगतच्या पाण्यातील अलिकडच्या तणावामुळे वस्तू आणि आंतरराष्ट्रीय ऊर्जेच्या प्रवाहावर परिणाम झाला आहे आणि त्यामुळे प्रादेशिक शांतता आणि जागतिक स्थिरतेला हानी पोहोचली आहे, असे चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते लिन जियान यांनी माध्यमांबरोबरच्या वार्तालापामध्ये सांगितले. तसेच तणाव आणखी वाढू नये आणि प्रादेशिक अशांततेचा जागतिक आर्थिक विकासावर युद्धाचा मोठा परिणाम होऊ नये म्हणून चीनने सर्व बाजूंना लष्करी कारवाया तात्काळ थांबवण्याचे आवाहन केले असल्याचेही लिन म्हणाले. ट्रम्प यांच्या चीन भेटीबाबत चीन आणि अमेरिका एकमेकांशी संपर्कात आहेत. चीन-अमेरिका संबंधांमध्ये दोन्ही देशांच्या राष्ट्रप्रमुखांची राजनैतिक कूटनीति अविभाज्य धोरणात्मक भूमिका बजावते, असेही त्यांनी सांगितले.

## विद्यापीठात आज एकदिवसीय राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन

प्रतिनिधी । जळगाव

**पीएम उषा अंतर्गत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भारतीय मानव्य प्राच्यविद्या अध्ययन केंद्र, कला व मानव विद्या प्रशाळेच्यावतीने दि. १८ मार्च रोजी विद्यापीठात क्रीडा सृष्टीमध्ये भारतीय सृष्टी एकदिवसीय राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. नॉलेज पार्टनर म्हणून क्रीडा भारती सहभागी होणार आहे.**

नवीन शैक्षणिक धोरण अंतर्गत शारीरिक शिक्षण व खेळ, संतुलित आहार, क्रीडा शासनाच्या योजना तसेच खेळातून रोजगाराच्या संधी याची माहिती देऊन भविष्यातील दिशा निर्माण करणे या दृष्टिकोनातून राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेत अखिल भारतीय महामंत्री क्रीडा भारती पुणे येथील केशव चौधरी यांचे बीज भाषण होणार आहे. तसेच नवीन शैक्षणिक धोरणात क्रीडा धोरणांचा अंतर्भाव या विषयावर नागपूर येथील डॉ.निरव पांड्या, भारतीय पारंपरिक आहार व आधुनिक पोषणशास्त्र या विषयावर छत्रपती संभाजीनगर येथील डॉ.प्रा.दयानंद कांबळे, क्रीडा विकासासाठी केंद्र व राज्य शासनाच्या योजना व खेळातून रोजगाराच्या संधी या विषयावर क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक, अमृत बिराडे मार्गदर्शन करतील.

## श्रीराम शाळेच्या समोर भंगार दुकानाला आग

प्रतिनिधी । शहादा



शहरातील रामेश्वर कॉलनीमधील श्रीराम शाळेच्या समोर असलेल्या भंगार दुकानाला दि.१७ रोजी सकाळी ८.२० वाजेच्या सुमारास आग लागल्याची घटना घडली.

रामेश्वर कॉलनीमधील श्रीराम शाळेच्या समोर भंगार दुकानाला आग लागल्याने गोलाणी फायर स्टेशन, एमआयडीसी फायर स्टेशन अशा दोन फायर फायटरने संपूर्ण आग विझवली. वेस्टे मटेरियल, प्लास्टिक व इतर सामान जळून नुकसान झाले. आग विझविण्यासाठी प्रभारी अग्निशमन अधिकारी भारत बारी, वाहनचालक देविदास सुरवाडे, संजय भोईटे, फायरमन रोहिदास चौधरी, जगदीश साळुंखे, ऋषभ सुरवाडे, तेजस बडगुजर, सुमित साळवे, संदीप कोळी यांचा सहभाग होता.

समीर पिंजारी यांच्या खबरीवरुन अकस्मात आगीची नोंद करण्यात आली.

# गॅस तुटवड्याने मेस चालक हैराण

## मेसचे डब्बे पुरविण्यास असमर्थ, विद्यार्थ्यांची उपासमार!

प्रतिनिधी । जळगाव

**गॅस सिलिंडर पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. घरगुती गॅससह आता व्यावसायिक गॅस मिळत नसल्याने मेस चालकांना त्याचा फटका बसला असून मेस बंद करण्याची वेळ आली आहे. मात्र, मेसवर अवलंबून असलेल्या शहर परिसरातील विद्यार्थ्यांची उपासमार झाली आहे. शासनाने प्राधान्यक्रम ठरवला असला तरी नागरिकांची गॅस मिळविण्यासाठी वणवण सुरूच असल्याचे वास्तव चित्र आहे.**

शासनाने गॅस टंचाई दूर करण्यासाठी अनेक पावले उचलली आहेत. जिल्हा स्तरावर पथके स्थापन केली, गॅस वितरणाचा प्राधान्यक्रम ठरवला, पण नागरिकांच्या अडचणी दूर होतांना दिसत नाही.

गॅस सिलिंडर मिळत नसल्याने आता शहरातील हॉस्टेल, शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना जेवणाचे डब्बे देणारे मेस चालक अडचणीत आले आहे. वेळेवर एलपीजी गॅस मिळत नसल्याने जेवणाचे डब्बे पुरवणे अवघड झाले. त्यामुळे मेस बंद करण्याची वेळ त्यांच्यावर आली असल्याचे अनेक मेस चालकांनी सांगितले. उदर्निवाहाच्या साधनावर गदा आल्याने मेस चालक हैराण झाले आहे.

जिल्हा व शहर परिसरात मोठ्या प्रमाणात शाळा कॉलेजचे विद्यार्थी राहतात. त्यातच सिलिंडरचा काळाबाजार सुरू आहे. ते सिलिंडर घेणेही परवडत नसल्याचे मेस चालकांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. तसेच नवीन नवीन ग्राहकाचा डब्बा स्वीकारणे बंद केले आहे. त्यामुळे पुरवठा सुरळीत कधी होणार असा सवाल आता नागरिक, विद्यार्थी उपस्थित करत आहेत. शासनाने प्राधान्य क्रमानुसार रुग्णालये, शैक्षणिक संस्था, स्मशानभूमी, वृद्धाश्रम आणि अनाथाश्रमांना १०० टक्के पुरवठा दिला जावा असे, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांनी सांगितले आहे. पण पुरवठा साखळी खंडित झाल्याने या विद्यार्थ्यांसह नागरिकांवर उपाशी राहण्याची वेळ आली आहे.



केंद्र सरकारने ७ मार्च २०२६ पासून घरगुती एलपीजी सिलिंडरच्या किमतीत वाढ केली असून ती ८९२.५० रुपयांवरून ९१२.५० रुपये करण्यात आली आहे.

व्यावसायिक सिलिंडरची किंमतही १७२०.५० रुपयांवरून १८३५ रुपये करण्यात आली आहे. सरकारी दर एकीकडे आणि काळ्याबाजारात आणखी जास्त दर आकारला जात आहे. त्यामुळे मेस चालविण्याची कोंडी होत आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.- ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✻ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी** (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# जिल्ह्यात गॅस दरवाढीचा उडाला भडका

## गॅस सिलिंडरचा तुटवडा, महागाईवर तत्काळ उपाय योजना करा; शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निषेध आंदोलन

प्रतिनिधी । जळगाव

अमेरिका, इजरायल-इराण युद्धाच्या झळा सर्वसामान्य नागरिकांना देखील बसत आहे. परिणामी शहरासह जिल्ह्यात गॅस दरवाढीचा भडका उडाल्याने नागरिक मेटाकुटीस आले आहेत.जळगाव शहरासह जिल्ह्यातील नागरिकांना गॅस बुकिंग केल्यानंतर अवघ्या ९६ तासात (४ दिवसांत ) सिलिंडर घरपोच मिळणे बंधनकारक करावे, अशी मागणी करीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हाप्रमुख प्रा.भाऊसाहेब सोनवणे व शिवसेना तालुका प्रमुख प्रमोद घुगे यांनी केली आहे.

पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी गॅस ग्राहकांसाठी मोठा दिलासा दिला असून तोच ९६ तासाचा नियम जळगाव जिल्ह्यात लागू करावा. त्यासाठी दि. १७ मार्च रोजी सकाळी ११ वाजता गॅस सिलिंडर दरवाढ तसेच अघोषित तुटवडा तत्काळ दूर करण्यासाठी उपाय योजना कराव्यात. अमेरिका, इजरायल-इराण यांच्या युद्धामुळे




भारतात गॅस सिलिंडरचे दर वाढले. तसेच तुटवडा जाणवत आहेत. म्हणून महाराष्ट्र सरकारने जळगाव जिल्ह्यातील तसेच राज्यातील गॅस सिलिंडर टंचाई दूर करावी व साठेबाजी रोखण्यासाठी प्रयत्न करावा. गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत करण्यात यावा व गॅस सिलिंडर दरवाढ रद्द करण्यात यावी; अन्यथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे स्टाईलने आंदोलन करणार येईल, असा इशारा या वेळी देण्यात आला.

### ➤ जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

गॅस दरवाढीच्या निषेधार्थ शिवसेना ठाकरे गटातर्फे जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तोंडाला काळी पट्टी बांधून निषेध आंदोलन करण्यात आले. त्यानंतर जळगाव ग्रामीणचे शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रा.भाऊसाहेब सोनवणे, शिवसेना जळगाव तालुका प्रमुख प्रमोद घुगे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले.

या वेळी जळगाव ग्रामीणचे शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रा.भाऊसाहेब सोनवणे, शिवसेना जळगाव तालुका प्रमुख प्रमोद घुगे, योगेश चौधरी, प्रेमराज राठोड, योगेश पाटील डॉ.रमाकांत कदम, भगवान धनगर, किरण ठाकूर, मनसेचे प्रदीप पाटील, अशोक पाटील, रामदास कोळी, खुशाल अहिरे, महेश अहिरे, भीमराव पांडव, प्रमोद सोनवणे, प्रसाद पाटील, सचिन चौधरी, शांताराम उशिर यांच्यासह शिवसैनिक या आंदोलनात सहभागी झाले होते.

# पाणीपट्टी न भरल्यास जळगाव, मलकापूरसह अनेक शहरांचा पाणीपुरवठा होणार खंडित!

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यातील हतनूर, वाघूर, सुकी, तोंडापूर आणि बहुळा या प्रकल्पांमधून बिगर सिंचन (औद्योगिक व पिण्यासाठी) पाणीपुरवठा घेणाऱ्या विविध संस्था आणि नगरपालिकांकडे कोट्यवधी रुपयांची पाणीपट्टी थकली आहे. वारंवार मागणी करूनही थकबाकी न भरल्याने, आता जलसंपदा विभागाने कठोर पाऊल उचलले असून २७ मार्चपर्यंत थकबाकी न भरल्यास जळगाव व मलकापूर येथील पाणीपुरवठा बंद करण्याचा इशारा दिला आहे.**

जळगाव पाटबंधारे विभागाने प्रसिद्ध केलेल्या जाहीर प्रकटनानुसार, जळगाव महानगरपालिका, मध्य रेल्वे भुसावळ, औष्णिक विद्युत केंद्र दीपनगर यांसारख्या मोठ्या संस्थांसह अनेक नगरपालिकांकडे मोठी थकबाकी आहे. कार्यकारी अभियंता, जळगाव पाटबंधारे विभाग यांनी स्पष्ट केले आहे की, संबंधित संस्थांनी २७ मार्च २०२६ पूर्वी आपल्या थकबाकीचा भरणा करावा. या मुदतीत पैसे न भरल्यास नियमानुसार पाणीपुरवठा बंद करण्यात येईल. यामुळे नागरिकांची किंवा उद्योगांची जी काही गैरसोय किंवा नुकसान होईल, त्याला सर्वस्वी संबंधित संस्था जबाबदार राहतील, असेही प्रशासनाने बजावले आहे. या कारवाईमुळे जळगाव जिल्ह्यातील अनेक शहरांच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे..

### थकबाकीदार संस्था, योजना अन् त्यांची थकबाकी (रुपये लाखांत)

मध्य रेल्वे भुसावळ – ३२४४.६४, २. औष्णिक विद्युत केंद्र दीपनगर (टप्पा-२) – १५३६.३०, ३. जळगाव महानगरपालिका, जळगाव – १४६८.६९, ४. अमळनेर न.पा. – ५२८.६३, ५. भुसावळ न.पा. – ४९०.८४, ६. औष्णिक विद्युत केंद्र दीपनगर (टप्पा-३) – ३४७.५०, ७. विंध्य पेपर मिल दुखेडे – ३४७.००, ८. मलकापूर न.पा. – ३२४.३७, ९. धरणगाव न.पा. – २४३.३५, १०. जामनेर न.पा. – २३४.१४, ११. एम.आय. डी.सी. मलकापूर – २०५.४८, १२. औष्णिक विद्युत केंद्र दीपनगर (टप्पा-१) – २०३.२२, १३. फैजपूर वाढीव पा.पु.यो. – १५१.९८, १४. चोपडा सहसाखर कारखाना, चोपडा – १३०.७७, १५. पाचोरा न.पा. – १२४.८७, १६. यावल न.पा. – ७७.८५, १७. चोपडा न.पा. – ७२.४३, १८. शेंदुर्णी नगरपंचायत शेंदुर्णी – ६४.३६, १९. रावेर न.पा. – ५६.२०, २०. सावदा वाढीव पा.पु.यो. – ४४.५८, २१. मधुकर सहसाखर कारखाना, फैजपूर – ४०.५३, २२. आर. पी.डी. भुसावळ – २४.३३.

## थोडक्यात

### दिव्यांग उमेदवारांसाठी आज रोजगार मेळाव्याचे आयोजन

**जळगाव ।** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जळगाव आणि सेंट्रल युथ फॉर जॉब फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग उमेदवारांसाठी रोजगार व समुपदेशन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा दि. १८ मार्च रोजी सकाळी १० वाजता शासकीय तांत्रिक विद्यालय परिसर, जी. एस. ग्राउंड जवळ, जळगाव येथे होणार आहे. या मेळाव्यात फोकस ह्युंदाई, सॅमसंग सर्व्हिस सेंटर, मिल्कवे महा ई-सेवा केंद्र, एविडर इनोव्हेशन प्रा. लि., व्हिटामिन एम कन्सल्टंट, हिरा अॅग्रो, रँडस्टॅड इंडिया प्रा. लि., अॅमेझॉन प्रा. लि. आदी नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. १० वी, १२ वी तसेच पदवीधर (इ.उे, च.उे आदी) पात्रता असलेल्या इच्छुक दिव्यांग उमेदवारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### डॉ. सुधीर नारखेडे यांना वॅलर अवॉर्ड प्रदान

**जळगाव ।** वैद्यकीय क्षेत्रात अनेक वर्षांपासून निस्वार्थ सेवा बजावणारे आणि संकटकाळात सहकाऱ्यांना तसेच रुग्णांना खंबीर साथ देणारे महादेव हॉस्पिटल येथील प्रसिद्ध स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ज्ञ डॉ. सुधीर नारखेडे यांना राज्यस्तरीय प्रतिष्ठित मॉग्स-अमॉग्स वॅलर अवॉर्ड देऊन गौरवण्यात आले आहे. मुंबईतील हॉटेल जे. डब्ल्यू. मॅरिअट इंटरनॅशनल (सहार) येथे पार पडलेल्या अमॉग्स २०२६ या राज्यस्तरीय परिषदेत त्यांना या सन्मानाने गौरवण्यात आले. मुंबई ऑब्स्टेट्रिक अँड गायनॅकॉलॉजिकल सोसायटी आणि असोसिएशन ऑफ महाराष्ट्र ऑब्स्टेट्रिक्स अँड गायनॅकॉलॉजिकल सोसायटीज यांच्या संयुक्त विद्यमाने हा पुरस्कार सोहळा केला होता.

# श्रीराम मंदिरात गुढीपाडव्यापासून रामनवमी महोत्सवास प्रारंभ

प्रतिनिधी । जळगाव

**कान्हदेशातील वारकरी संप्रदायाचे थोर सत्पुरुष व जळगाव नगरीचे ग्रामदैवत श्रीराम मंदिर संस्थान गादी परंपरेतील मुळसत्पुरुष श्री सद्गुरू आप्पा महाराजांनी प्रारंभ केलेला श्रीरामनवमी जन्मोत्सव परंपरेने प्रतीवर्षाप्रमाणे ह.भ.प. मंगेश महाराजांच्या नेतृत्वाखाली यंदाही कलियुग वर्ष ५१२८, चैत्र शुद्ध वर्ष प्रतिपदा शके १९४८ श्री शालिवाहन शके १९४८ पराभव नाम नूतन संवत्सर दि. १९ मार्च गुढीपाडव्यापासून श्रीराम जन्म महोत्सवास प्रारंभ होत असून दि.२६ मार्चला श्रीरामनवमी व दि. २७ मार्च रोजी महोत्सवाची सांगता होईल.**



दि. १९ मार्च रोजी गुढीपाडवा या शुभदिनी पहाटे ४ वाजता काकड आरती, सकाळी ६.५४ वाजेनंतर पराभव संवत्सर (नूतनवर्ष) जलग्राम वासीयांच्या सुखशांतीसाठी ग्रामदैवत प्रभु श्रीरामांचे चैतन्यमयी मुर्तीस महापुजा, अभिषेक, आरती होईल. सकाळी ९ वाजता महाआरती होईल. यानंतर श्रीराम मंदिर संस्थानच्या प्रांगणात गोमाता पूजन, वार्षिक उत्सवाचे ध्वजस्तंभ पूजन विद्यमान गादीपती ह.भ.प.मंगेश महाराजांचे हस्ते होईल. दुपारी ११ वाजता नूतन पंचांग पूजन, वाचन मुकुंद धर्माधिकारी गुरुजी, दुपारी १२ वाजता महानैवेद्य आरती होईल. दि.१९ ते दि.२६ मार्च हरदिनी विविध रामसेवा होईल. यात पहाटे ५ वाजता काकडा, भजन, काकड आरती, सकाळी पूजाभिषेक, विष्णुसहस्त्रनाम, तुलसी अर्चना, गोमाता पूजन, मंगल आरती, श्री दासबोध पारायण मकरंद देशमुख, दुपारी १२ महानैवेद्य, दुपारी ४ ते ६ महिला मंडळ भजन सेवा, संध्याकाळी ६.१५ संध्यावंदन, श्रीरामरक्षा स्तोत्र पठण, धुपारती, वेदमंत्रपठण सेवा, श्रीरामनामजप रात्री ८ वाजता नित्यनेमाचे परंपरेची श्री संत ज्ञानेश्वर महाराज हरिपाठ, भजनसेवा, दि.१९ मार्च रोजी श्री समर्थ भजनी महिला मंडळ (रामपेठ), पंचांग पूजन वाचन वे. मू. श्रीराम महाराज जोशी, दि.२० मार्च रोजी मोरया महिला मंडळ (मारुतीपेठ), दि.२१ मार्च रोजी जय श्रीकृष्ण महिला मंडळ, दि.२२ मार्च रोजी राष्ट्र सेविका महिला मंडळ, दि.२३ मार्च रोजी सुरेल सखी महिला भजनी मंडळ, २४ मार्च रोजी गणेश भजनी गणेशवाडी, दि. २४ मार्च रोजी प्रभू श्रीरामजींच्या जन्माचे अभंग सोहळा आयोजित करण्यात आला आहे..

# केळी पीक विमा प्रस्तावांची पडताळणी; अपात्र अर्ज नामंजूर करण्याची प्रक्रिया सुरू

प्रतिनिधी । जळगाव

**पुनर्रचित हवामानावर आधारित फळपिक विमा योजना (आंबिया बहार) सन २०२५-२६ अंतर्गत जळगाव जिल्ह्यात भारती कृषि विमा कंपनीमार्फत योजना राबविण्यात आली आहे. या योजनेत एकूण ९९,९४८ शेतकऱ्यांनी सहभाग घेत १,०३,३६९ हेक्टर क्षेत्र संरक्षित केले असून शेतकरी हिस्सा म्हणून ८७.६२ कोटी रुपये विमा कंपनीकडे जमा करण्यात आले आहेत.**

राज्य शासनाच्या निर्देशानुसार अंबिया बहार हंगाम २०२५-२६ मधील केळी पिकांच्या विमा प्रस्तावांची पडताळणी सुदूर संवेदन तंत्रज्ञानाच्या (ठशोींश डशपीळपस ढशलहपेश्रेसू) माध्यमातून महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग अॅप्लिकेशन सेंटर (चठड-उ) मार्फत करण्यात आली. जळगाव, मुक्ताईनगर, यावल, रावेर, चोपडा, धरणगाव व जामनेर या सात तालुक्यांतील जास्त विमा क्षेत्र असलेल्या भागांची तपासणी करण्यात आली. या तपासणीत ९१,८८० शेतकऱ्यांच्या ९६,१५७.२० हेक्टर विमा क्षेत्रापैकी ५०,२११.३३ हेक्टर क्षेत्रावर प्रत्यक्ष फळपिक आढळून आले, तर ४५,९४५.८७ हेक्टर क्षेत्रावर केळी पिक आढळून आले नाही. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांचे विमा प्रस्ताव योजनेच्या तरतुदीनुसार नामंजूर करण्याची प्रक्रिया विमा कंपनीमार्फत सुरू करण्यात आली आहे. यासंदर्भात संबंधित शेतकऱ्यांनी आपले म्हणणे मांडायचे असल्यास २३ मार्च २०२६ पर्यंत तालुका कृषी अधिकारी कार्यालयात निवेदन सादर करण्याचे असे आवाहन जिल्हास्तरीय आढावा समितीमार्फत करण्यात आले आहे. निर्धारित कालावधीत निवेदन सादर न केल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, असेही जिल्हास्तरीय आढावा समितीमार्फत स्पष्ट करण्यात आले आहे.दरम्यान, भुसावळ, बोदवड, अमळनेर, एरंडोल, पारोळा, चाळीसगाव, भडगाव व पाचोरा या आठ तालुक्यांतील फळपिक विमा प्रस्तावांची प्रत्यक्ष पडताळणी प्रक्रिया सुरू आहे. यामध्ये ७,२६७ शेतकऱ्यांच्या ७,०७४.३० हेक्टर क्षेत्रापैकी ४,१६० शेतकऱ्यांचे ३,८३०.५५ हेक्टर क्षेत्रावर फळपिक आढळून आले असून २,२३० शेतकऱ्यांच्या २,११८.२३ हेक्टर क्षेत्रावर पिक आढळून आलेले नाही. उर्वरित शेतकऱ्यांची तपासणी प्रक्रिया सुरू आहे. असे सदस्य सचिव, जिल्हास्तरीय आढावा समिती तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांनी सांगितले.

# बलिदान मास शिवव्याख्यान कीर्तन सोहळा

प्रतिनिधी । जळगाव

त्रिमुर्ती मित्रमंडळाच्या वतीने बलिदान मास शिवव्याख्यान-कीर्तन सोहळा दि.१६ रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. विशाल महाराज वेरुळकर यांच्या पहाडी आवाजातून छत्रपतींच्या शंभूराजे यांच्या कार्याची आणि बलिदानाची आठवण संपूर्ण समाजाला करून देण्यात आली.

सोहळ्यात चंदू महाराज आणि गायक-वादक समूहाने ताल धरून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. कीर्तनाचे मानकरी प्रमोद घुगे यांनी विशाल महाराज वेरुळकर यांचा शाल आणि पुष्पहार घालून सत्कार केला. त्रिमुर्ती मित्रमंडळाचे सदस्य कैलास फेगडे, निर्मल पाटील, योगेश फेगडे, धनंजय दुसाने, गणेश मिस्त्री, महेश पाटील, मयुर पाटील, विशाल शेवाळकर, राजेश्वर चिंचोले, स्वप्निल पाटील, महेंद्र पाटील, भुषण पाटील, प्रसाद पाटील, कृष्णा सोनवणे, चंद्रकांत पाटील, रितेश पाटील, बबलु पाटील, अक्षय पाटील, अभिजित सोनवणे, सुधीर पाटील, महेश महाजन, मनोज कोल्हे, योगेश घुगे, जयवीर पाटील, वेदांत पाटील, दीपक महाजन, लोकेश राजपूत आणि खुशाल अहिरे यांनी मनापासून परिश्रम घेऊन हा कीर्तन सोहळा यशस्वीपणे पार पाडला. यावेळी शेकडो नागरिक उपस्थित होते. महिला, पुरुष, तरुण, मुलं-मुली तसेच बाळगोपाळांनीही किर्तनाचा लाभ घेतला आणि उत्साहात सहभागी झाले.

# वसतिगृहातील खानावळ ठेकेदारांसोबत कुलगुरुंची बैठक

प्रतिनिधी । जळगाव

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विद्यार्थी विद्यार्थिनींच्या वस्तीगृहातील खानावळ ठेकेदार यांच्यासोबत कुलगुरू प्रा. व्ही एल माहेश्वरी यांनी बैठक घेऊन गॅस सिलेंडर पुरवठासंदर्भात आढावा घेतला.**

सद्यस्थितीतील गॅस सिलिंडर संदर्भात निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेऊन विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थिनींना वस्तीगृहात भोजन व्यवस्थेकरिता विविध खानावळ चालवणे संदर्भात ठेका पद्धतीने काम देण्यात आले आहे. सदरच्या उद्धवलेल्या परिस्थितीच्या अनुषंगाने विद्यार्थी विद्यार्थिनींना भोजन व्यवस्था सुरळीत राहण्याकरिता विद्यापीठातील विविध खानावळ पुरवठादार यांच्या समवेत कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांनी त्यांच्याकडून संवाद साधला.

# मनपा कर्मचाऱ्यांनी दबावाला बळी न पडता नियमांनुसार काम करावे : चौधरी

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव महानगरपालिकामधील कर्मचाऱ्यांनी आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी आणि कोणत्याही प्रकारच्या दबावाखाली न येता नियमांनुसार काम करावे, असे आवाहन उपमहापौर मनोज चौधरी यांनी केले. चांगले काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पाठीशी लोकप्रतिनिधी कायम उभे राहतील, असे आश्वासनही त्यांनी दिले.**

महानगरपालिकेत आयोजित कर्मचारी संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. या बैठकीस उपायुक्त निर्मला गायकवाड, धनश्री शिंदे, मुख्य लेखाधिकारी व लेखापरीक्षक विजयकुमार सोनवणे, सहाय्यक आयुक्त उदय पाटील तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान अनेक कर्मचाऱ्यांनी आपल्या समस्या आणि मागण्या मांडल्या. त्यामध्ये स्थायित्व प्रमाणपत्र देणे, अतिरिक्त कामाचा भार, निम्न पदावर असतानाही वरिष्ठ पदाची कामे करावी लागत असल्याने मोबदला मिळावा, बीएलओची अतिरिक्त जबाबदारी कमी करणे, दीर्घकाळ प्रलंबित पदोन्नती, विमा सुविधा उपलब्ध करून देणे, पगाराची निश्चित तारीख ठरवणे, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची एटीएम सेवा पुन्हा सुरू करणे, तसेच प्रभाग समित्यांसाठी वाहन उपलब्ध करून देणे अशा विविध मुद्द्यांचा समावेश होता. याशिवाय २००५ नंतर सेवेत दाखल झालेल्या कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्याची मागणीही करण्यात आली. प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले की, सध्या महानगरपालिकेत सुमारे १३०० कर्मचारी कार्यरत असून कर्मचारी संख्या कमी असल्यामुळे अनेकांना अतिरिक्त जबाबदाऱ्या द्याव्या लागत आहेत. पदोन्नती प्रक्रियेत काही तांत्रिक अडचणी असून काही पदे कालांतराने कमी झाली आहेत. नवीन भरतीसाठी आवश्यक प्रक्रिया सुरू असून बिंदूनामावलीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त कार्यालयाकडे पाठवण्यात आला आहे. कालबद्ध पदोन्नतीसंदर्भात पहिल्या टप्प्यात ४५० कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली असून पुढील प्रक्रिया सुरू असल्याचेही सांगण्यात आले. तसेच स्थायित्व प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येणार असून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या थकित रकमा देण्यासाठीही तरतूद केली जात असल्याची माहिती प्रशासनाने दिली.

यावेळी उपमहापौर मनोज चौधरी यांनी सांगितले की, ज्या कर्मचाऱ्यांना बैठकीत आपली समस्या मांडता आली नाही त्यांनी त्या पुढील चार ते पाच दिवसांत उपमहापौर कार्यालयाकडे लेखी स्वरूपात द्याव्यात. सर्व प्रश्नांवर सकारात्मक मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

# स्त्रियांच्या जगण्याची दिशा हेच संसाराचं सर्वात मोठं सुख

## श्री गजानन ज्येष्ठ नागरिक संघाच्या कार्यक्रमात डॉ.मिलिंद बागुल यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । जळगाव

संस्कारक्षम पिढी आणि देश घडविण्यासाठी स्त्रियांचे योगदान अनन्यसाधारण असे असून त्यांच्या जगण्याची दिशा हेच संसाराचे सर्वात मोठे सुख आहे. पुरुषप्रधान संस्कृतीत संसाराचा महत्वपूर्ण भाग सांभाळणाऱ्या स्त्रिया जीवनातल्या अनेक समस्यांना सामोरे जात असताना देखील सांसरीक प्रगतीचा त्या ध्यास सतत घेत असतात. त्यांच्या या प्रयत्नपूर्वक ध्यासामुळेच समाज व्यवस्था ही गतिमान आणि संस्कारक्षम झालेली दिसून येते, असे उद्गार साहित्यिक डॉ.मिलिंद बागुल यांनी केले.



श्री. गजानन जेष्ठ नागरिक संघातर्फे जागतिक महिला दिनाच्यानिमित्त आयोजित कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष अॅड. राजेंद्र पाटील होते. याप्रसंगी जळगाव मनपा स्थायी समिती सभापती डॉ. चंद्रशेखर पाटील, कवयित्री इंदिरा जाधव अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. बापू शिरसाठ, अॅड. स्मिता झाल्टे, कवी प्रकाश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांनी देखील मार्गदर्शन केले.याप्रसंगी शासनाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल कवी अशोक कोतवाल यांचा सत्कार करण्यात आला. त्यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, स्त्रियांच्या जगण्यातील वास्तवता ही संघर्षशील असण्यासोबतच वास्तवाला भिडणारी देखील असते. या भिडणाऱ्या स्त्रिया एक नवा इतिहास निर्माण करत समाज घडविण्याचा प्रयत्न करत असल्याचे मत देखील त्यांनी याप्रसंगी मांडले. प्रास्ताविक मंगल बी. पाटील यांनी केले.

### • नाटिका सादर

मान्यवरांचे स्वागत राजेंद्र पन्हाळे, बापू पाटील, मीराबाई ठाकरे, अरुण पाटील, नारायण पाटील, अॅड. सतीश पाटील, अॅड. राजेंद्र वाघ, माधवराव पवार, वंदना सांगळे, मधुकर पाटील, जयंत कुरकुरे, अजय तांबटकर, मधुकर बराटे, अमृत पाटील, जयश्री मांडोळे, ज्ञानेश्वर जाधव, लता चौधरी यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. प्रांजल उमेश पाटील, आरोही राहुल देसले यांनी स्त्री जन्मा तुझी कहाणी ही नाटिका याप्रसंगी सादर केली.

# नववर्षाला हिंदु जनजागृती समितीतर्फे सामूहिक गुढीचे पूजन

प्रतिनिधी । जळगाव

**गुढी पाडव्याच्या निमित्ताने शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून हिंदू जनजागृती समितीच्यावतीने विविध ठिकाणी सामूहिक गुढी पूजनाचे आयोजन करण्यात आले आहे. नववर्षाचे स्वागत एकत्रितपणे करत सकारात्मक संकल्प करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात येत आहे.**

सामूहिक गुढी पूजनावेळी पर्यावरण संरक्षण, कॉलनीतील हिंदूंनी परस्परांमध्ये सौहार्दपूर्ण वातावरण ठेऊन संघटित होणे, तसेच निरोगी जीवनशैली अंगीकारण्यासाठी नियमित योगा, प्राणायाम आणि व्यायाम करण्याचे संकल्प नागरिकांकडून घेतले जाणार आहेत. शहरातील विविध ठिकाणी होणाऱ्या या सामूहिक गुढी पूजन कार्यक्रमात अधिकाधिक नागरिकांनी सहभागी व्हावे. तसेच चौघुले प्लॉट, वाल्मीक चौक, लक्ष्मीनगर (गेंदालाल मिल), ज्ञानदेव नगर चौक, पांझरापोळ चौक, के. सी. पार्क, मयुर कॉलनी, पिंप्राळा, मेहरूण, मारुती मंदिर, छत्रपती शिवाजीनगर, सुप्रीम कॉलनी या ठिकाणी सामूहिक गुढी पूजन करण्यात येणार आहे.

# जळगावच्या अजिंक्य पाटील यांच्या पुढाकाराने कुवेत येथे अडकलेल्या भारतीयांची सुरक्षित सुटका

## ● ३०० भारतीयांना संकटाच्या काळात मदत केल्यानेच ते सुखरूप आले मायदेशी

प्रतिनिधी । चोपडा

**मध्यपूर्वेत अचानक निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीत कुवेतमध्ये अडकलेल्या सुमारे ३०० भारतीय प्रवाशांची सुरक्षित सुटका करण्यात जळगाव जिल्ह्यातील अजिंक्य पाटील यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांनी संकटाच्या काळात दाखवलेले नेतृत्व, धैर्य आणि मानवतावादी दृष्टिकोन यामुळे अनेक भारतीय सुखरूप मायदेशी परतू शकले आहेत. त्यामुळे त्यांच्या धाडसी नेतृत्वाचे सर्वत्र कौतूक होत आहे.**

२८ फेब्रुवारी २०२६ रोजी कुवेत विमानतळावरून न्यूयॉर्ककडे उड्डाण केल्यानंतर त्यांचे विमान इराकच्या सीमेवर पोहोचत असतानाच इराण-अमेरिका-इझ्रायल संघर्ष तीव्र झाला. त्यामुळे इराकच्या एअर ट्रॅफिक कंट्रोल (-ढड) कडून त्या हवाई क्षेत्रात विमानांना प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आणि विमानाला पुन्हा कुवेत सिटी येथे वळवावे लागले. विमानात त्या वेळी सुमारे



१५ तासांचा इंधनसाठा असल्याने सुरक्षित लँडिंगसाठी वैमानिकांना हवेतच इंधन कमी करावे लागले. त्यानंतर विमानाचे कुवेत येथे आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. त्यामुळे अजिंक्य पाटील यांच्यासह सुमारे ३०० प्रवासी ७ मार्च २०२६ पर्यंत कुवेतमध्ये अडकून पडले. दरम्यान, विमानतळाच्या टर्मिनलमध्ये प्रवासी थांबलेले असतानाच परिसरात इराणकडून ड्रोन हल्ले झाल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले. या परिस्थितीत कुवेत एअरवेज आणि स्थानिक प्रशासनाने तत्परता दाखवत ३०० हून अधिक प्रवाशांना सुरक्षितपणे शहरातील हॉटेलमध्ये हलवले. हॉटेलच्या खिडकीतून त्यांना अमेरिकन दूतावास परिसरातील हल्ल्यांची परिस्थितीही दिसत होती.

बाहेर युद्धजन्य परिस्थिती असतानाही अजिंक्य पाटील यांनी आपली व्यावसायिक जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली. त्यांनी हॉटेलमधूनच लिमिना' या कंपनीच्या विलीनीकरणासंदर्भातील महत्त्वाच्या बैठका न्यूयॉर्क आणि स्वीडनमधील सहकाऱ्यांसोबत ऑनलाइन पद्धतीने पूर्ण केल्या.दरम्यान, स्वतः सुरक्षित बाहेर पडण्याचा पर्याय उपलब्ध असतानाही त्यांनी आपल्या सोबत अडकलेल्या भारतीय प्रवाशांना आधी सुरक्षित बाहेर काढण्याचा निर्णय घेतला.

स्थानिक अधिकाऱ्यांशी समन्वय साधत प्रवाशांना बसने सौदी अरेबियाची राजधानी रियाध येथे नेण्याचे नियोजन करण्यात आले. सुमारे ७०० किलोमीटरचा प्रवास करून सर्व प्रवासी सुरक्षितपणे रियाध येथे पोहोचले.

**चार्टर विमानाने मुंबईत आगमन**

रियाध येथे पोहोचल्यानंतर पुढील प्रवासाची व्यवस्था करण्यात आली. तेथून फ्लायनास एअरवेज च्या चार्टर विमानाद्वारे सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे मुंबई येथे आणण्यात आले.या संपूर्ण बचाव मोहिमेमुळे युद्धजन्य परिस्थितीत शेकडो भारतीयांना सुरक्षितपणे मायदेशी परतता आले.

### ● बचाव मोहिमेचे नियोजन

कुवेतमध्ये अडकलेल्या भारतीय प्रवाशांशी संवाद साधून अजिंक्य पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी परिस्थितीचा आढावा घेतला. त्या काळात प्रवाशांना धीर देणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि सर्वांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी नियोजन करणे हे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले.

## थोडक्यात

### अभय शास्ती योजनेला मुदतवाढ देण्यात यावी : राजेंद्र पाटील

**जळगाव ।** अभय शास्ती योजनेला मुदतवाढ देण्यात यावी, या मागणीचे निवेदन प्रभाग क्र. १९ 'ड' चे नगरसेवक राजेंद्र पाटील यांनी महानगरपालिका आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे यांना दिले. महानगरपालिकेमार्फत नागरिकांच्या थकीत मालमत्ता करांवरील दंड माफ करून वसुली वाढविण्यासाठी राबविण्यात आलेली अभय शास्ती योजना नागरिकांसाठी अत्यंत दिलासादायक ठरली आहे.

### मोहराळे जि.प. शाळेला संगणक संच भेट

**मोहराळे, ता. यावल ।** येथील जिल्हा परिषद मराठी शाळेत आयडीबीआय बँक शाखा यावल यांनी विद्यार्थ्यांसाठी कॉम्प्युटर, प्रिंटर, झेरॉक्स मशीन व संगणक संच शाळेला भेट दिला. शालेय समिती अध्यक्ष धनराज पाटील व शिक्षकांनी बँकेचे चेअरमन सुभत्रदास, बी.एम. अरिदम, ए.एम. गजानन, कन्हैया वाणी, बडगुजर, प्रमोद महाले यांचे शाळेच्या वतीने स्वागत व सत्कार केला. यावेळी मुख्याध्यापक पडवी, शिक्षका हसीना तडवी उपस्थित होते.

## पारोळ्यात २६ जणांना घरकुल मंजूर

प्रतिनिधी । पारोळा

शहरात सध्या सुरू असलेल्या २०२५-२०२६ वर्षातील नवीन घरकुलासाठी २६ लाभार्थ्यांना पीएमएवाय या योजनेच्या अंतर्गत शासनाकडून घरकुल मार्च महिन्यात मंजूर झालेली आहेत. तसेच मागील यादीतील ९४ घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहे, असे लाभार्थ्यांसोबत बोलताना बांधकाम विभागाचे अभियंता महाजन यांनी सांगितले. तसेच त्यावेळी मुख्याधिकारी यांनी २६ लाभार्थ्यांना नवीन घरकुले मंजूर झाली आहेत. याबाबत सर्व लाभार्थ्यांना सुचविले की, शासनाकडून प्राप्त झालेले घरकुल आपण लवकर पूर्ण करून घ्यावीत. शासन आपणास पूर्ण मदत करेल, असे आश्वासन त्यांनी दिले. या कार्यक्रमाला नगरपालिका मुख्याधिकारी, अभियंता, ज्युनि इंजिनियर शहरातील लोकनियुक्त नगराध्यक्ष व नगरसेवक तसेच शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मोठ्याप्रमाणात लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ दिल्याने शहरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## अमळनेर येथे एकाला मारहाण

प्रतिनिधी । अमळनेर

माझ्याकडे पाहून का हसत होता? या कारणावरुन एकाने फायटरने मारहाण केल्याची घटना तालुक्यातील जवखेडा येथे रात्री १० वाजता बसस्टँडसमोर घडली. नेताजी वसंत पाटील हे शेतातून घरी मोटारसायकलने जात असताना बसस्थानकाजवळ नितेश पंकज पाटील याने त्यांना अडवून माझ्याकडे पाहून का हसत होता?, असे विचारुन रागात मोटारसायकलला लाथ मारली आणि खाली पाडले. फायटरने तोंडावर मारले.

## चोपडा नगराध्यक्षांतर्फे ज्येष्ठ नागरिक संघाचा सन्मान

प्रतिनिधी । चोपडा

**येथील ज्येष्ठ नागरिक संघास महाराष्ट्र राज्याचे ३५ वे अधिवेशन नाशिक येथे अति उत्कृष्ट संघ म्हणून राज्यस्तरीय पुरस्कार मिळाला. त्याबद्दल नगरपरिषदेच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा नम्रता पाटील, उपाध्यक्ष पंकज बोरोले यांनी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष जयदेव देशमुख, यांचा सत्कार केला.**



ज्येष्ठ नागरिक संघ उत्कृष्ट कार्य करीत असून भविष्यात अजून जोमाने काम करणे गरजेचे आहे. चोपडा संघ यात नक्कीच प्रगती करून वृद्धांचे एक आशास्थान बनेल, अशी आशा लोकनियुक्त नगराध्यक्षांनी व्यक्त केली. यावेळी उपाध्यक्ष नेरपगारे आबा , कोषाध्यक्ष दिलीपराव पाटील, तसेच मुख्याधिकारी रामनिवास झंवर, इंजिनीअर डिगंबर वाघ नगरसेवक किशोर चौधरी व इतर नगरसेवक हजर होते.

## मुक्ताईनगरला ५८ दिव्यांग विद्यार्थ्यांची मोफत फिजिओथेरपी तपासणी

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

येथील पंचायत समिती शिक्षण विभाग व समावेश शिक्षण उपक्रम गटसाधन केंद्र यांचेकडून शून्य ते अठरा वयोगटातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी फिजिओथेरपी शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात तालुक्यातील शाळांमधील एकूण ५८ दिव्यांग विद्यार्थ्यांची मोफत फिजिओथेरपी तपासणी करण्यात आली. या शिबिरात डॉ हर्षल पाटील यांनी दिव्यांग विद्यार्थी व त्यांच्या पालकांचे समुपदेशन केले. संकल्प फिजिओथेरपी क्लिनिक येथे तपासणी केलेल्या ५८ दिव्यांग विद्यार्थ्यांना विविध सेवा सुविधा पुरविण्यात येतील. शिबिराच्या



सुरुवातीला गटशिक्षणाधिकारी वसंतराव मोरे, उचंदा केंद्राचे केंद्रप्रमुख संजय ठोसर पाटील आदींनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून शिबिराचे उद्घाटन केले. समावेशित शिक्षण उपक्रमांचे विशेष शिक्षक संजय पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले.

## जिल्हास्तरीय थ्रो-बॉल स्पर्धेत इंदिराबाई ललवाणी विद्यालयाचा संघ विजयी

प्रतिनिधी । जामनेर

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे, जळगाव जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तसेच श्री स्वामी समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कुसुंबा यांच्या संयुक्त विद्यमाने १४, १७ व १९ वर्षे वयोगटातील मुले-मुलींच्या जिल्हास्तरीय शालेय थ्रो-बॉल क्रीडा स्पर्धा उत्साहात पार पडल्या. स्पर्धेत इंदिराबाई ललवाणी माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत १७ वर्षांखालील मुलांचा संघ विजयी ठरला. या संघाची नाशिक विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे. १७ व १९ वर्षांखालील मुलींचा संघ उपविजयी ठरल्याने विद्यालयाच्या नावलौकिकात भर पडली आहे. स्पर्धेनंतर विजयी संघांचा सत्कार संस्थाध्यक्ष मनोज पाटील, श्री शिवछत्रपती पुरस्कार विजेते किशोर चौधरी, संघटनेचे सचिव संजय निकम, ज्येष्ठ क्रीडा शिक्षक पी.पी. पाटील आदींनी विजेत्यांचा सत्कार केला.

## फैजपूरच्या श्रीकृष्ण मंदिरात दत्त मूर्तीचा मंगल अभिषेक

प्रतिनिधी । फैजपूर

फैजपूर येथील लक्कड पेठ परिसरातील होले वाड्यातील श्रीकृष्ण मंदिरात परंपरेनुसार दररोज विविध भाविकांच्या हस्ते श्री दत्त मूर्तीचा मंगल अभिषेक केला जातो. या परंपरेनुसार रविवारी सकाळी ८ वाजता नगरसेविका सुनीता नेहेते व अनंत नेहेते यांच्या हस्ते श्री दत्त मूर्तीचा मंगल अभिषेक करण्यात आला. यावेळी विधिवत पूजा, आरती व प्रसाद अर्पण करण्यात आला. राजधर बाबा पूजदेकर यांनी विधिवत पूजन करून मंदिराची माहिती उपस्थितांना दिली. तसेच मंदिरात होत असलेल्या विविध धार्मिक कार्यक्रमांबाबत चर्चा करण्यात आली.

## पाळधीत साईबाबा मंदिरात स्लॅब कोसळला

प्रतिनिधी । पाळधी

**येथील साईबाबा मंदिर परिसरात नव्याने उभारण्यात येत असलेल्या भक्तनिवासाच्या बांधकामादरम्यान स्लॅब अचानक कोसळल्याने काम करत असलेल्या ६ ते ७ मजुरांमध्ये एकच गोंधळ उडाला. या दुर्घटनेत दोन कामगार गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर तातडीने वैद्यकीय उपचार सुरू आहेत.**



येथील साईबाबा मंदिर परिसरात भक्तांसाठी नव्या भक्तनिवासाची उभारणी सुरू होती. अचानक बांधकामाचा स्लॅब कोसळल्यामुळे काही कामगार ढिगाऱ्याखाली अडकले. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आणि उपस्थित लोकांमध्ये चिंतेची लाट पसरली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि उपस्थित कामगारांनी तातडीने मदतकार्य सुरू करून जखमी कामगारांना बाहेर काढले. जखमींना त्वरित उपचारासाठी जळगाव येथील शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले. घटनेच्या ठिकाणी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य प्रताप पाटील पोहोचले. त्यांनी जखमी कामगारांची पाहणी केली आणि त्यांना तातडीने वैद्यकीय मदत मिळावी, यासाठी प्रयत्न केले. प्रताप पाटील यांनी सांगितले की, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र दोन कामगार गंभीर जखमी आहेत. घटनेनंतर बांधकामाच्या सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्लॅब कोसळण्यामागील नेमके कारण शोधण्यासाठी संबंधित यंत्रणांकडून तपास सुरू आहे. तसेच नागरिकांनी आणि उपस्थित लोकांनी बांधकामाच्या कामांमध्ये सुरक्षितता नियम काटेकोरपणे पाळण्याची मागणी केली आहे.

## ज्वारीच्या कणसावर मोठ्याप्रमाणात अळीचा प्रादुर्भाव

प्रतिनिधी । भडगाव

रब्बी उन्हाळी अशा संमिश्र हंगामात पेरणी केलेल्या ज्वारीच्या निसवाड झालेल्या ज्वारीत दाणा भरण्याच्या महत्वपूर्ण कालावधीतच कणसावर मोठ्याप्रमाणात अळीचा प्रादुर्भाव झाला आहे. ही अळी इतक्या मोठ्याप्रमाणात झाली असून ही अळी कणसे दाण्याचा रस व मोठा दाणा खात असल्याने परिपक्व होण्याच्या अवस्थेतील दाण्याचा रस सोचल्याने तसेच



दाण्याची मोठ्याप्रमाणात गळ होत असल्याने हातातोंडाशी आलेल्या ज्वारीचं उत्पन्न येईल की नाही. तसेच येईल तर जेमतेमच येईल, अशी गंभीर स्थिती निर्माण झाल्याने ज्वारी उत्पादक शेतकरी धास्तावले असून कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी तात्काळ ज्वारी पेरणी केलेल्या शेतात पाहणी करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे, अशी मागणी ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांनी केली आहे. एका कणसावर कमीत आठ ते दहा अळ्या दिसून येत आहे. ही स्थिती संपूणज्वारी पिकांवर उद्भवली आहे. काही शेतकरी यावर फवारणी करत आहेत.



## पारोळा नगरपरिषदेच्या मालकीचे हॅन्डपंप पाणी असूनही मोजताहेत अखेरची घटका

### ● शहरातील नगरसेवक व नगराध्यक्षांनी आपआपल्या वार्डातील हॅण्डपंप दुरुस्त करावेत

प्रतिनिधी । पारोळा

**येथील नगरपरिषद हद्दीत ३० ते ३५ हॅन्ड पंप असून नगरपरिषदेच्या निष्काळजीपणामुळे शहरवासीयांना हँडपंपांना पाणी असून देखील ते मिळत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे. याकडे पालिकेने त्वरित लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.**

भरमसाठ कर घेवूनही नगरपालिका ८ दिवस १० दिवसांनी शहराला पाणी पाजणारी नगरपालिका शहरातील हॅन्डपंप का दुरुस्ती करीत नाहीत? हा मोठा प्रश्न शहरातील नागरिकांना पडलेला आहे आज देखील शहरातील अनेक लोक पोलीस स्टेशन, कृषी उत्पन्न बाजार समिती, गुरांच्या दवाखाना, पाण्याच्या टाकी, पंचायत समिती तर काही हॉटेल चालकांकडे देखील २४ तास पाणी उपलब्ध असल्याकारणाने काही गोरगरीब लोक पिण्याचे पाणी व वापरण्यासाठी पाणी घेण्यास जातात. शहरातील विहिरींना देखील मोठ्याप्रमाणात पाणी उपलब्ध आहे आणि हॅन्डपंपांना पाणी आहे. फक्त देखभाल दुरुस्तीची गरज आहे .मार्च महिन्यामध्ये सूर्य आग ओकायला



लागला की,पाण्याची टंचाई भासते. एप्रिल मे व जून महिना देखील पाण्यासाठी संकटाचे असतात. याशिवाय वेळेवर पाऊस न पडल्यास नागरिकांना विहिरीकडे व हँड पंपांकडेच वळावे लागणार आहे. सर्व नगरसेवक व नगराध्यक्ष याकडे लक्ष देतील का? नगरपरिषद ८ ते १० दिवसांनी काहीतरी प्रॉब्लेम आल्याने पिण्याचे पाणी देत असते. यावर उपाय म्हणून संकट काळात विहीर आणि हॅन्डपंप दुरुस्ती करणे योग्य होईल. हँड पंपांची होत असलेली दुरवस्था दुरुस्त करून नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची आपापल्या प्रभागातील नगरसेवकांनी व लोकनियुक्त नगराध्यक्ष चंद्रकांत पाटील व मुख्य अधिकारी तुषार नेरकर यांनी हॅन्ड पंप दुरुस्तीची मागणी करावी. जेणेकरून गेल्या ४/५ वर्षापासून बंद असलेल्या हँड पंप पुन्हा सुरू होऊन शहरवासीयांना त्यातून उपलब्ध होणारे पाणी गुरे-ढोरांना पाणी पाजण्यासाठी महिलांना भांडी, कपडे धुण्यासाठी घरातील इतर वापरण्याच्या कामात अडथळा येईल. हॅन्ड पंप दुरुस्त न झाल्यास शहरातील नागरिकांच्या रोष हा नगरसेवकांकडेच असेल, असे देखील नागरिक बोलू लागले आहेत.